# गठीत करण्यात आलेल्या समितिच्या बैठकिचा इतिवृत्तांत

विषयः- न्यायालयीन प्रकरणाचा निकाल तपासी यंत्रणा अथवा अभियोक्त्यांच्या हलगर्जीपणामुळे शासनाच्या विरुध्द गेला असल्यास, संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यासाठी व त्याबाबतच्या शिफारसी करण्या साठी गठीत समितीची दिनांक २२/११/२०१८ रोजी आयोजित करण्यात आलेल्या बैठकिचा इतिवृत्तांत

संदर्भ :- शासन परिपत्रक क्रमांक डीपीपी-२०१५/प्र.क्र.५१/पोल-१०, दिनांक १७ ऑक्टोबर, २०१५ अन्वये

------- o o o -------

उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयास अनुसरुन अपर पोलीस अधीक्षक यांचे दालनात दिनांक २२/११/२०१८ रोजी न्यायालयीन प्रकरणाचा निकाल तपासी यंत्रणा अथवा अभियोक्त्यांच्या हलगर्जीपणामुळे शासनाच्या विरुध्द गेला असल्यास, संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यासाठी व त्याबाबतच्या शिफारसी करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीचे अध्यक्ष श्री. संजयकुमार पाटील, अपर पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण. सदस्य श्रीमती व्हि. आर. चंदने, सहा. सरकारी वकील व अतिरिक्त सरकारी अभियोक्ता, ठाणे तसेच पोलीस निरीक्षक श्री. व्हि. आर. आंधळे, स्थानिक गुन्हे शाखा हे हजर होते. सदर बैठकितील चर्चेत श्रीमती ज्योत्स्ना काळण, विधी अधिकारी गट- ब, ठाणे ग्रामीण यांनाही बोलाविण्यात आले होते.

१) सर्वप्रथम दिनांक २१/०६/२०१८ रोजी नमुद समितीची बैठक झाली असता त्यात माहे एप्रिल २०१८ पावेतोच्या प्राप्त निकालाच्या प्रतींचा आढावा घेण्यांत आला होता. उर्वरीत निकालाच्या प्रती प्राप्त करुन त्यांचा आढावा सदर बैठकित घेण्यांत आला. तसेच मार्च महातील शिल्लक २ केसेस व मे ते जुलै महातील प्राप्त निकालाच्या प्रतिंचा अभ्यास करण्यांत आला. तसेच जेएमएफसी कोर्टातील सप्टेंबर

Scanned by CamScanner

महातील एक केस अशा एकुण सोळा सुटलेल्या खटल्यांचा अभ्यास करण्यांत आला.

२) चर्चेदरम्यान एकुण सोळा केसेसमध्ये तपासी अंमलदार यांची चुकी आढळुन आली. परंतु १) मिरारोड पोस्टे गुरनं I ४००/०७ भादवि ३०४ (ब), ४९८ (अ), ३४, कोर्ट केस नं. ८६/१३ २) कल्याण ता. पोस्टे गुरनं II १२/९७ अजाज ३,१ (एक्स), कोर्ट केस नं. २२/०२, ३) मुरबाड पोस्टे गुरनं I १३०/०२, भादविस ४५१,३५४,३२३,५०४,५०६,३४ सह अजाज. ३ (१)(एक्य), कोर्ट केस नं. १०४/०३, ४) शहापूर पोस्टे गुरनं I २१०/०२ भादविस ४९८ (अ), ३०४ (ब), ३२३, ५०४, ५०६, ३४ कोर्ट केस नं. ५३/०३ ५) शहापुर पोस्टे II २५/१६ अजाजक ३ (२), १४, ३(४), १४, ३(५), ३(८), कोकेनं. १३०/०७ ६) मिरारोड पोस्टे गुरनं I १२४/१५ भादविसक ३५४, ५०६ सह पोक्सो ॲक्ट क. ९(क),१० कोकेनं २४०/१५ ७) काशिमिरा पोस्टे गुरनं II ०२/१३, भादविसक ३०२ कोकेनं. २१२/१३ ८) काशिमिरा पोस्टे गुरनं I १७/१३ भादविसक ५०९ पोक्सो ॲक्ट क. ८ स्पेकेनं. ४९/१६ ९) मुरबाड पोस्टे गुरनं I १९/०७ भादविसक ३०६, ३४ कोकेनं ५९/०८ १०) काशिमिरा पोस्टे गुरनं I ५५८/१५ भादविसक ४९८ अ, ३०६, ५०४, ३४ कोकेनं २३५/१७ हया केसमध्ये तपासी अंमलदार यांचे व्यतिरिक्त ईतरही कारणांमुळे केस सुटल्याचे निदर्शनास आल्याने त्यात फक्त तपासी अंमलदार यांची चुकी आढळुन येत नाही. त्यामुळे त्यांचेवर कसुरी अहवाल ठेवता येत नाही.

३) उर्वरीत १) मिरारोड पोस्टे गुरनं II १०७/१७ एनडीपीएस २७ कोकेनं. १८/१७ २) नयानगर पोस्टे II १९/१६ एनडीपीएस २७ कोकेनं. ३३/१६ ३) नयानगर पोस्टे II १६/१६ एनडीपीएस २७ कोकेनं. ३६/१६ ४) नयानगर पोस्टे I १४३/१६ भादविस ३७० (३), अनैतिक मानवी वाहतुक अधि. १९५६ कोर्ट केस. नं. ४६/१६ ५) कल्याण ता. पोस्टे I २००/११ भादविसक ३०२, ३७६ (एफ), ३६६ (अ), ४४१, २०१, कोकेनं. १६५/१२ ६) गणेशपुरी पोस्टे I १६/०४ भादविसक ३२५, ३२३, ५०४, ५०६, ३४ ,

Scanned by CamScanner

कोकेनं ६९७/०४ (जेएमएफसी) हया सहाही केसेस तपासी अधिकारी यांच्या चुकीमुळे, हलगर्जिपणामुळे निर्दोष मुक्त झाल्याचे चर्चेदरम्यान निदर्शनास आले आहे. करिता नमुद खटल्यातील तपासी अंमलदार त्यांचेवर कसुरी अहवाल पाठविण्याची दक्षता घेतली आहे.

४) दोषसिध्दीचे प्रमाण वाढविण्याकरिता आणखी काय काय उपाययोजना राबविता येतील यावर चर्चा करण्यात आली.

**सदस्य**

(व्हि.आर.आंधळे)
पोलीस निरीक्षक,
स्थानिक गुन्हे शाखा,
ठाणे ग्रामीण

**सदस्य**

(व्हि. आर. चंदने)
सहा.सरकारी वकील व
अतिरिक्त सरकारी अभियोक्ता
ठाणे

**अध्यक्ष**

(संजयकुमार पाटील)
अपर पोलीस अधीक्षक,
ठाणे ग्रामीण

**प्रतः-** १) सहा.सरकारी वकील व अतिरिक्त सरकारी अभियोक्ता, ठाणे
२) पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, ठाणे ग्रामीण

**प्रत माहितीस्तव सविनय सादर :-**

मा. विशेष पोलीस महानिरीक्षक सो,
कोंकण परिक्षेत्र, नवी मुंबई.

जा.क्र.: आर/६०५/समिती बैठक/इतिवृत्तांत/३०९९/१८
दि. २३/११/२०१८

Scanned by CamScanner